# *फ्लिपकार्ट समर्थ* साजरी करत आहे कारागीर, विणकर आणि वंचित समुदायांसाठी ई-कॉमर्सच्या लोकशाहीकरणाची वर्षपूर्ती

- फ्लिपकार्ट समर्थमध्ये कारागीर, विणकर आणि ग्रामीण उद्योजकांसाठी सहा महिन्यांनंतर सर्व विभागांमध्ये प्रमाणित किमान कमिशनसारखे अनेक नवे फायदे
- फ्लिपकार्टच्या फुलफिलमेंट सेंटर्समध्ये समर्थ विक्रेते भागिदारांना मिळणार प्रशिक्षण आणि खास जागा, सातत्याने पाठिंबा आणि या व्यासपीठावर अधिक दृश्यात्मकता आणि कॅटलॉगसंबंधी मार्गदर्शन
- या उपक्रमाने कारागीर, विणकर आणि हस्तकलाकारांना ई-कॉमर्स व्यासपीठावर आणण्यासाठी आजवर सात सरकारी संस्थांसोबत भागीदारी केली आहे

**बंगळुरु - ३१ जुलै २०२०** : फ्लिपकार्ट ही संपूर्णत: भारतात विकसित झालेली ई-कॉमर्स बाजारपेठ आज *फ्लिपकार्ट समर्थ* या आपल्या उपक्रमाची पहिली वर्षपूर्ती साजरी करत आहे. वंचित, स्थानिक समुदाय आणि व्यवसायांना अधिक मोठ्या संधी आणि चांगला रोजगार मिळवून देत त्यांना सक्षम करण्यासाठी शाश्वत आणि सर्वसमावेशक व्यासपीठ उभारण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. *फ्लिपकार्ट समर्थ*च्या माध्यमातून या व्यवसायांना फ्लिपकार्टच्या देशभरातील २० कोटींहून अधिक संख्येने असलेल्या ग्राहकांपर्यंत पोहोचता येते. त्यामुळे स्थानिक पातळीवर तयार केलेल्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या देशात व्यवसायाचे खऱ्या अर्थाने लोकशाहीकरण करण्यात येत आहे.

एक वर्ष पूर्ण होत असताना फ्लिपकार्टने *फ्लिपकार्ट समर्थ* उपक्रमाच्या माध्यमातून अधिक सुविधा देऊ केल्या आहेत आणि विक्रेत्या भागीदारांसाठी अनेक नवे फायदे सादर केले आहेत. या व्यासपीठावर आल्यानंतर पहिल्या सहा महिन्यांसाठी प्रत्येक *फ्लिपकार्ट समर्थ* विक्रेत्याला शून्य टक्के कमिशनची सोय देण्यात आली आहे. तसेच, सहा महिन्यांनंतर या विक्रेत्यांना या उद्योगातील सर्वसाधारण संकेतानुसार पाच टक्के कमिशन आकारले जाईल. या विक्रेत्यांना सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यामुळे, या क्षेत्रातील ठरलेल्या दरानुसार कमशिन आकारल्याने या विक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय ऑनलाइन वाढवण्यासाठी अधिक व्यापक संधी उपलब्ध होतील. इतकेच नाही, *फ्लिपकार्ट समर्थ विक्रेत्यांना* मर्यादित उत्पादनांसाठी मोफत कॅटलॉगिंगची सुविधा देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या व्यासपीठावर अधिक ठळकपणे दिसण्यात साह्य व्हावे, यासाठी पहिल्या महिन्यात जाहिरातींचे क्रेडिट दिले जाईल, ई-कॉमर्स पद्धतींशी जुळवून घेताना मदतीचा हात म्हणून नोंदणी आणि लिस्टिंगचे प्रशिक्षण दिले जाईल आणि फ्लिपकार्टच्या फुलफिलमेंट सेंटर्समध्ये खास जागा आणि सातत्याने सेलर सपोर्टही पुरवला जाणार आहे.

या वंचित गटाला व्यासपीठावर दाखल होणे आणि विक्रेता म्हणून पुढील प्रवास सहजपणे करता यावा, तसेच डिजिटल जगात त्यांचे अस्तित्व निर्माण करता यावे यासाठी साह्य करणे, हा या लाभांमागील उद्देश आहे.

आजघडीला, *फ्लिपकार्ट समर्थ* देशभरातील ६००,००० हून अधिक कारागिर, विणकर आणि हस्तकलाकारांना रोजगारासाठी साह्य करत आहे आणि अशा विक्रेत्यांना या व्यासपीठावर आणण्यासाठी प्रयत्न करत आहे.

फ्लिपकार्टतर्फे आयोजित व्हर्च्युअल कॉन्फरन्समध्ये बोलताना आज **भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग राज्यमंत्री श्री. प्रताप चंद्र सारंगी** म्हणाले, "*एमएसएमई क्षेत्राचे योगदान आपल्या अर्थव्यवस्थेत सर्वात दमदार आहे. देशाच्या प्रगतीतील त्यांचा वाटा लक्षणीय आहे आणि त्यांच्यामध्ये वृद्धीच्या प्रचंड क्षमता आहेत. अनेक क्षेत्रांमध्ये खासगी आणि सार्वजनिक कंपन्या पुढे जाण्यासाठी एकत्र येत प्रयत्न करताहेत आणि ई-कॉमर्स क्षेत्रालाही हे बदल खूप पुढे घेऊन जाणारे आहेत. यातील सगळ्यात मोठा फायदा म्हणजे भारतीय एमएसएमई आणि हस्तकला क्षेत्राला जागतिक दृष्टिकोन अंगिकारता येणार आहे. हीच वेळ आहे भारतातील हस्तकला आणि कलाकुसरीच्या संपन्न वारशाला हस्तकला आणि वस्तूंचे जागतिक केंद्र बनवण्याची आणि ई-कॉमर्स कंपन्यांच्या सहकार्यामुळे ही दोन्ही पक्षांसाठी फायदेशीर स्थिती असणार आहे.*"

गेल्या वर्षभरात फ्लिपकार्टने भारतभरातील अनेक सरकारी संस्थांशी भागीदारी करत स्थानिक कारागिर, विणकर आणि हस्तकलाकारांना या व्यासपीठाचे लाभ मिळावेत यासाठी आणि ई-कॉमर्सच्या परिघात आणण्यासाठी भरीव प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांअंतर्गत गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालय, यूपी खादी विलेज अॅण्ड इंडस्ट्रीज बोर्ड आणि दिनदयाळ अंत्योदर योजना नॅशनल अर्बन लाइव्हलीहुड्स मिशन (डीएवाय-एनयूएलएम) यांच्यासोबत भागीदारी करून भारतातील २२ राज्यांमध्ये फ्लिपकार्ट समर्थची स्थापना करण्यात आली आहे. शिवाय इतरही अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत.

**उत्तर प्रदेशचे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, निर्यात संवर्धन, खादी आणि ग्रामोद्योग विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. नवनीत सेहगल म्हणाले,** "*आत्मनिर्भर भारत ही स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी आणि आर्थिक प्रगतीला वेग देण्यासाठी दिलेली हाक आहे. 'मेक इन इंडिया'ला एका वरच्या पातळीवर नेण्यासाठी एमएसएमईंच्या बहुक्षेत्रीय भूमिकेला नवे आयाम देण्यासाठी या भागीदाऱ्या महत्त्वाची भूमिका बजावतील. समर्थ उपक्रमाअंतर्गत फ्लिपकार्टने यूपी खादी मंडळासोबत केलेल्या भागीदारीमुळे उत्तर प्रदेशातील खादी आणि हातमाग विभागातील विक्रेत्यांवर प्रचंड व्यावसायिक परिणाम झाला आहे. फ्लिपकार्ट समर्थ उपक्रमात लखनऊमधील एक व्यावसायिक आघाडीचा विक्रेता बनतो आणि या उपक्रमाला पुढे नेण्यात नेतृत्व स्थानी पोहोचतो, हे पाहणे फारच उत्साहवर्धक आहे. फ्लिपकार्ट समर्थसारखे उपक्रम खऱ्या अर्थाने लहानमोठ्या सर्व उद्योगांना यशस्वी होण्यासाठी सर्वसमावेशक परिसंस्था उभारतात आणि त्याचवेळी स्थानिक कारागिर आणि हातमागांसाठी समान परिस्थिती निर्माण करतात.*"

**फ्लिपकार्ट समूहाचे चीफ कॉर्पोरेट अफेअर्स ऑफिसर श्री. रजनीश कुमार** म्हणाले, "*एक भारतीय कंपनी म्हणून, नाविन्यपूर्ण आणि स्थानिक पातळीवर तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून देशातील मोठे आणि छोटे उद्योग आणि विक्रेत्यांसाठी व्यवसायाचे लोकशाहीकरण करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे. सर्वांनाच, विशेषत: समाजातील वंचित समुदायांना फायदेशीर ठरणाऱ्या आमच्या परिसंस्थेचे सर्वसमावेशक स्वरूप फ्लिपकार्ट समर्थमधून अधोरेखित होते. आपल्या देशापुढील व्यावसाय आणि ग्राहक अशा दोन्ही पातळ्यांवरील*

*अवघड आव्हाने तंत्रज्ञानाचा वापर करून सोडवण्याच्या आमच्या दृष्टिकोनाला हा उपक्रम अगदी साजेसा आहे. या समुदायांपुढील सामाजिक आणि भौगोलिक अडथळे दूर करून त्यांना अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे आमचे प्रयत्न आम्ही यापुढेही कायम ठेवणार आहोत. या वर्षपूर्तीने आम्हाला अधिक आत्मविश्वास आणि भविष्यातील कामगिरीसाठी स्पष्ट दिशा दिली आहे. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करतानाच पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर दृष्टिकोनाला अनुसरून आम्ही छोटे उद्योग, ग्रामीण उद्योजक आणि भारतीय हस्तकलेला साहय करण्याचे आणि आमची व्यापकता वृद्धिंगत करण्याचे प्रयत्न सुरूच ठेवणार आहोत."*

**फ्लिपकार्टचे वरिष्ठ संचालक आणि मार्केटप्लेसचे प्रमुख जगजीत हारोडे** म्हणाले, "*स्थानिक आणि एरवी दुर्लक्षित असलेल्या आपल्या देशातील हस्तकला आणि हातमाग क्षेत्राला प्रकाशात आणण्याच्या ई-कॉमर्सच्या क्षमता फ्लिपकार्ट समर्थच्या एक वर्षाच्या या प्रवासातून समोर आल्या आहेत. सरकारी भागीदारींच्या साहयाने आम्ही आजवर ओदिशा, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, गुजरात, पंजाब आणि कर्नाटकातील दुर्गम भागातील कारागिरांना ऑनलाइन आणू शकलो. आम्ही केलेल्या प्रगतीमुळे आम्हाला प्रोत्साहन मिळाले आहे आणि हा उपक्रम आणखी पुढे नेणे हे आमचे लक्ष्य आहे. अधिक प्रमाणात रोजगारावर परिणाम करता यावा यासाठी आम्ही अधिक संस्था आणि व्यक्तींपर्यंत पोहोचणार आहोत."*

समर्थ उपक्रमाच्या माध्यमातून फ्लिपकार्ट स्वयंसेवी संस्था, सरकारी मंडळे आणि रोजगार उपक्रमांसोबत काम करून ग्रामीण उद्योजकांपर्यंत मोठ्या प्रमाणावर पोहोचत आहे. यात महिलांच्या संस्था, अपंग उद्योजक, कारागिर आणि विणकरांचा समावेश आहे. या समुदायांना बऱ्याचदा खेळत्या भांडवलाची अनुपलब्धता, फारशा सुविधा नसणे आणि पुरेसे प्रशिक्षण नसणे अशा अडथळ्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्या समस्या आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षा अचूक जाणून घेणे *फ्लिपकार्ट समर्थ*ला शक्य झाले आणि त्यातून या समस्या सोडवण्यासाठी त्यांना साहय केले जात आहे.

*वॉलमार्ट वृद्धी*च्या माध्यमातून फ्लिपकार्ट एमएसएमईजना साहय करत आहे. स्थानिक आणि जागतिक बाजारपेठांसाठी 'मेक इन इंडिया'च्या अनुषंगाने ५०,००० एमएसएमईजना सक्षम करण्यासाठीचा हा पुरवठादार विकास उपक्रम आहे. यातून फ्लिपकार्टचा व्यवसाय आणि वॉलमार्टच्या वितरण साखळी आणि तज्ज्ञतेचे साहय देऊन खास प्रशिक्षण आणि मार्गदर्शन केले जाते. तसेच सहकारी आणि मार्गदर्शकांच्या उपलब्धतेसाठी परिसंस्था उभारली जाते.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create

lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India's fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact: media@flipkart.com.**